**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-१०/०८/२०११

प्रति,
मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र. २ मंगळवार दि.१६/०८/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**मंगळवार दिनांक- १६/०८/२०११ ची विषय पत्रिका**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १४ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ बुधवार दि. २७/०४/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| १५ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९मधील नमुद केलेली कर्तव्ये व अधिकार मा. आयुक्त साहेब यांना प्राप्त झालेले आहेत त्या मधील वर्ग-४ चे कर्मचा-यांची अर्जित रजा, वैद्यकीय रजा मंजूर करण्याचे व पगाराचे दाखले देण्याचे अधिकार तात्पुरत्या स्वरूपात आस्थापना प्रमुख यांना प्रदान करणेत येत असलेबाबत आदेश अखेर मंजूरीस्तव. |
| १६ | अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र येथे केंद्र संचालक म्हणून श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची दि.२५/२/२०११अखेर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूक केलेली असून त्यांना मानधन रूपये १०,०००/- ऐवजी रूपये १५,०००/-ते २०,०००/- पर्यत मानधनात वाढ करणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| १७ | श्रीमती शेख रईसा अब्दुल्ला शकुर, रा.घर नं. १/२ वाबळे कॉलनी मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये १३,७००/- वॉर्ड क्र.८५ बील क्रमाक ५२३ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १८ | श्री. दत्तात्रय नारायण शिंदे, रा.घर नं. ६, ड्रिमॅलन्ड सोसायटी मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००३-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये १०,५००/- वॉर्ड क्र.८५ बील क्रमाक ६५१ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १९ | सौ. बहार अंजुम वाहब सय्यद, रा. घर नं.सी १ ,सी २ वाबळे कॉलनी मुंकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये २०,२१२/- वॉर्ड क्र.८५ बील क्र. ३९६,३९७ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २० | श्री. शेख सलाउद्दीन इस्माईल , रा.घर नं. ४१/४३ हमीद पार्क मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये १२,११२/- वॉर्ड क्र.८८ बील क्रमाक ४५५ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २१ | श्री. शेख सलीम अल्लाबक्ष , रा. घर नं. ५९ बी हिनापार्क मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये ७५००/- वॉर्ड क्र.८८ बील क्रमाक २३८ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

...२

| | |
|---|---|
| २२ | श्रीमती जाहिदाबानो हमीदखान पठाण, रा. घर नं. १६, ड्रिम लॅन्ड सोसायटी बॉम्बे हॉस्पीटल मागे यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रू. ७५००/- वॉर्ड क्रमांक ८५ बील क्रमांक ६६१ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २३ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता मोरे पल्लवी दगडु यांची तात्पुत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर कंत्राटी करारानुसार अटी शर्ती प्रमाणे दरमहा रूपये १३,०००/- फक्तचे मानधनावर दि. ३/५/२०११पासून सहामहिन्याकरिता केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २४ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नमुद केलेली कर्तव्ये व अधिकार मा.आयुक्त साहेबांना प्राप्त आहेत त्यापैकी, अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य/ घनकचरा व्यवस्थापन विभागातील कचरा संकलन व वाहतुक करणे कामी वापरण्यांत येणा-या वाहनांची देखभाल व दुरूस्ती इत्यादी खर्चासाठी रूपये २०००/- पर्यत खर्च करण्याचे अधिकार प्रभाग अधिकारी यांना प्रदान करणेत येत असले बाबत मा.आयुक्त साहेब यांचा आरोग्य / घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र. १९ दि.२६/४/२०११ रोजीचा आदेश अखेर मंजूरीस. |
| २५ | अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक, प्रा.श्री.एन.बी. मिसाळ यांनी स्पर्धा परिक्षा केंद्रात येणा-या विषयतज्ञ, व्याख्याते यांना प्रतितास मानधन वाढवून देणे बाबत केलेला अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| २६ | अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागामध्ये स्वयंचलित यांत्रिकी, कनिष्ठ अभियंता या पदावर श्री.स्वप्निल बाळकृष्ण पवार यांना दरमहा रू.१०,०००/-फक्तचे मानधनावर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सहामहिन्या करिता नेमणूक देणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| २७ | अहमदनगर महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्याकरिता वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची दिनांक १७/६/२०११ पासून सहा महिन्याकरिता दरमहा रूपये १०,०००/- फक्तचे मानधनावर कंत्राटी करारानुसार नेमणूक देणेस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २८ | अहमदनगर महानगरपालिकेचे मौजे सावेडी येथील नगररचना योजना क्रमांक ४ अंतीम भुखंड क्रमांक १२८सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल (फेज-१) मधील पहिले मजल्याचे हॉल क्रमांक४ अर्जदार सहाय्यक निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय यांना रूपये १४,००२/- फक्त (मालमत्ता करा विरहीत)दरमहा भाडे आकारून भाडे तत्वावर देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ |
| २९ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकरिता पंपचालक , विज तंत्री पदी तात्पुरत्या स्वरूपात चार महिन्याकरिता रूपये ६०००/- फक्तचे मानधनावर नेमणूक करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३० | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ म्हणून दरमहा रूपये १५००/-फक्तचे मानधनावर दिनांक२८/६/२०११ ते २७/१२/२०११ अखेर सहामहिने कालावधीसाठी कंत्राटी करारानुसार नेमणूक देणेस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३१ | अर्जदार रेव्ह फादर थॉमस डि कास्टा, संत आन्ना चर्च स.नं. १०५वॉर्ड क्र.१० बील नंबर २१२, कलेक्टर कचेरी समोर ही मिकळत धार्मिक क्षेत्र असल्यामुळे सन २००५-२००६ पासून कर आकारणी कमी करणे बाबतचा अर्ज व त्यावरील ऑाफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ३२ | अर्जदार श्री. नानकराम मोटुमल नवलानी वॉर्ड क्र.४२ बील क्र.४५५ व १२३० कंवरनगर तारकपुर यांना एकाच मिळकतीचे घरपट्टी कराचे दोन बीले येत असल्याबाबत त्यांचे घरपट्टीचे बील कमी करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

सोबत- १] विषय क्र.१४- मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ बुधवार दिनांक २७/०४/२०११ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्र. १५ ते ३२ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १४ — मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - १४ — मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ बुधवार दिनांक २७/०४/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर:-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ बुधवार दिनांक २७/०४/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.
सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा क्रमांक १ बुधवार दिनांक २७/४/२०११ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु. सो. :- मागिल सभा दिनांक २७/४/२०११ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- मागील सभा बुधवार दिनांक २७/४/२०११ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा. सभापती साहेब :- मा. स्थायी समिती सभा क्र.१ बुधवार दिनांक २७/४/२०११ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ बुधवार दिनांक २७/०४/२०११ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १५ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - १५ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९मधील नमुद केलेली कर्तव्ये व अधिकार मा.आयुक्त साहेब यांना प्राप्त झालेले आहेत त्या मधील वर्ग-४ चे कर्मचा-यांची अर्जित रजा, वैद्यकीय रजा मंजूर करण्याचे व पगाराचे दाखले देण्याचे अधिकार तात्पुरत्या स्वरूपात आस्थापना प्रमुख यांना प्रदान करणेत येत असलेबाबत आदेश अखेर मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका जा.क्र. सा.प्र.वि. ३००२ दिनांक १४/१२/२०१०

**<u>आदेश</u>**

आदेशीत करण्यांत येते की,आस्थापना विभागाचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम१९४९मधील नमुद केलेली कर्तव्य व अधिकार याबाबतचे वर्ग-४चे कर्मचा-यांचे अर्जित रजा,वैद्यकिय रजा मंजूर करण्यांचे व पगाराचे दाखले देण्याचे अधिकार तात्पुरत्या स्वरूपात आस्थापना प्रमुख यांना प्रदान करण्यांत येत आहे.सदरचे आदेश तात्काळ अमंलात येत आहेत.

तरी आपण उपरोक्त प्रमाणे तात्काळ कार्यवाही करावी.

येणे प्रमाणे मा. उपायुक्त सो., अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांचे आदेशाचे पत्र मा.आयुक्त यांचे मंजुरीने.

सबब आदेश मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा. आयुक्त सो. यांना प्राप्त झालेले अधिकारापैकी वर्ग- ४ चे कर्मचा-यांची रजा मंजूरीचे व पगार दाखले देण्याचे अधिकार तात्पुरत्या स्वरूपात आस्थापना प्रमुख यांना प्रदान करणेस अखेर मंजूरी देणे आहे.

मा.श्री. डागवाले कि. आ. :- अखेर मंजूरी देणेत यावी.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- मा.आयुक्त साहेब यांचेकडील वर्ग-४चे कर्मचा-यांची अर्जित रजा,वैद्यकीय रजा व पगार दाखले देणेचे अधिकार तात्पुरत्या स्वरूपात आस्थापना प्रमुख यांना देणेस अखेर मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते अखेर मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठरावः-</u>**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९मधील नमुद केलेली कर्तव्ये व अधिकार मा.आयुक्त साहेब यांना प्राप्त झालेले आहेत त्या मधील वर्ग-४ चे कर्मचा-यांची अर्जित रजा, वैद्यकीय रजा मंजूर करण्याचे व पगाराचे दाखले देण्याचे अधिकार तात्पुरत्या स्वरूपात आस्थापना प्रमुख यांना प्रदान करणेस अखेर मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक सही /- सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १६ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - १६ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र येथे केंद्र संचालक म्हणून श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची दि.२५/२/२०११ अखेर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूक केलेली असून त्यांना मानधन रूपये १०,०००/- ऐवजी रूपये १५,०००/ ते २०,०००/- पर्यत मानधनात वाढ करणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग दिनांक १/१/२०११

विषय- श्री. नारायण बाबुराव मिसाळ, यांचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक यांचे मानधन वाढी बाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री. नारायण बाबुराव मिसाळ, यांची जा.क्र. आस्था./कंत्राटी २०१ दि.१७/४/२०१० अन्वये अहमदनगर महानगरपालिकेत स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक म्हणून कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात दि.२४/८/०९ ते २४/२/२०१० अखेर दर महा रू.८०००/- एकत्रीत मुशाहि-यावर करार बध्द करण्यात येवुन दिनांक २५/२/१० ते २५/२/२०११ अखेर दरमहा रू.१०,०००/- एकत्रीत मुशाहि-यावर अटी व शर्तीवर करारबध्द करण्यात आलेले आहे.

श्री. मिसाळ यांनी दिनांक ३०/११/२०१० रोजी अर्ज देवुन कमी मानधन असल्याने व इतर सुविधा उपलब्ध नसल्याने दि. १ जानेवारी २०११ पासून त्यांचा राजीनामा मंजुर करून त्यांना कार्यमुक्त करणे बाबत विनंती केली होती.

तद्नंतर मा.उपायुक्त यांचे आदेशान्वये श्री. मिसाळ यांना जा.क्र. आस्था.३००१ दि.१४/१२/२०१० अन्वये समक्ष चर्चेस बोलविण्यात आलेले होते सदर चर्चेनंतर श्री. मिसाळ यांनी दिनांक १८/१२/१० रोजी अर्ज देवुन "मी दि.३०/११/२०१० रोजी दिलेल्या राजीनामा पत्रात दाखविलेल्या त्रृटी बाबत मा.उपायुक्त यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार त्यांनी त्वरीत कार्यवाही करणेबाबत आश्वासन दिल्याने मी माझा राजीनामा मागे घेत आहे" असे नमुद केलेले आहे.

श्री. मिसाळ यांच्या सदर अर्जान्वये त्यांचे दिनांक ३०/११/१० रोजी दिनांक १ जानेवारी २०११ पासून दिलेला राजीनामा जा.क्र. आस्था. ३२१९ दि.४/१/२०११ अन्वये रद्द करण्यात आलेला असुन त्यांचा दि.३०/११/२०१० रोजी अर्ज निकाली काढुन दप्तरी दाखल करण्यात आलेला आहे.

श्री. मिसाळ यांची नेमणूक दि.२५/२/२०११ अखेर असुन त्यांना दरमहा मानधन १०,०००/- इतके देण्यात येत आहे. त्यांनी दि.१८/१२/१० रोजी १० हजार मानधनात वाढ करून २५ ते ३० हजार मानधन वाढी बाबत विनंती केलेली आहे.

तरी श्री. मिसाळ यांनी दिलेल्या विनंती अर्जानुसार त्यांच्या मानधनात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे उचित होईल.

तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

--**--

मुख्य लेखा परिक्षक :- सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर चर्चेसाठी ठेवणेत यावा.
मुख्य लेखा अधिकारी :- रजेवर
मा.उपायुक्त साहेब :- स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र येथील काम तसेच जास्तीत जास्त विद्यार्थी यशस्वी झालेले आहेत याचा विचार करता सध्याच्या मानधनात वाढ करून ते रू.१५ ते २० हजार करणे योग्य होईल.तथापी याबाबत मा.स्थायी समितीने निर्णय घेणे योग्य होईल सबब आदेशार्थ.
मा.आयुक्त साहेब :- १५,००० ते २०,००० पर्यत प्रस्तावास हरकत नाही मा.स्थायी समिती पुढे ठेवा. दि.१०/१/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.
मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र येथील केंद्र संचालक श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांना मानधन वाढवून देणे विषयी प्रस्ताव आहे.
मा.श्री. डागवाले कि. आ. :- महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्राचे काम चांगले चाललेले असल्याने श्री. मिसाळ सर यांना मानधन वाढवून देणेत यावे.
मा.श्री. भोसले ग.पुं. :- मानधन रूपये १५,०००/- देणेस मंजूरी देण्यांत यावी.
मा.श्री. डागवाले कि.आ.:- श्री. मिसाळ सर यांना दरमहा मानधन वाढवून रू.१५,०००/- फक्त देणेस मंजूरी देणेत यावी.
मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र येथील केंद्र संचालक श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांना देणेत येणारे मानधनात वाढ करून रूपये १५,०००/- फक्त दरमहा मानधन देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र येथील केंद्र संचालक म्हणून श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची दि.२५/२/२०११ अखेर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूक केलेली असून त्यांना दरमहा मानधन रूपये १०,०००/- ऐवजी दरमहा रूपये १५,०००/ (रूपये पंधरा हजार फक्त) मानधन देण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १७ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - १७ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्रीमती शेख रईसा अब्दुला शकुर, रा. घर नं.१/२ वाबळे कॉलनी मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये १३,७००/- वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ५२३ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रभाग समिती क्र. ३ (झेंडीगेट) दि. / /२०१०

विषय- नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

संदर्भ :- श्री. शेख रईसा अब्दुला शकुर यांचा दिनांक ८/१२/२००९ रोजीचा अर्ज

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री. शेख रईसा अब्दुला शकूर, रा. वाबळे कॉलनी घर नं.१/२ ,अ.नगर यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केलेली आहे की, सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही सदर घराला सन २०० पासुन अचानक पाणीपट्टी आकारून प्रथमच सन २००९-२०१० मध्ये अचानक पाणीपट्टीची आकारणी करून बील देण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यांत यावे " अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड क्र.८५ बि.क्र. ५२३ वर श्री. शेख रईसा अब्दुला शकूर यांची मिळकत असुन त्यांच्या नांवे सन २००९-२०१० अखेर घरपट्टी रू.३९५४ /- व पाणीपट्टी रू.१३७००/- असे दोन्ही मिळुन रू.१७६५४/- इतकी थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे यांना सादर करणेबाबत सांगितले असता त्यांनी श्री. शेख रईसा अब्दुला शकूर , रा.- वाबळे कॉ. घर नं. १/२ यांच्या घराची नळ कनेक्शनची दि.८/१२/२००९ रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळून येत नाही, आस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दि.२९/५/२०१० रोजी इकडेस सादर केलेला आहे.

सन २००३ मध्ये माजी सैनिक यांच्या संस्थेने महानगरपालिकेतील हद्दीतील अनाधिकृत पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शनचे सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने केल्याचे आढळते.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.-३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे यांच्या अहवालानुसार चुकून लागलेली पाणीपट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणीपट्टीचे बील रद्द करणे संयुक्तीक वाटते. सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली मदतनीस वॉर्ड क्र.८५यांचा अहवाल असे.

कर निरिक्षक :- वसुली मदतनीस व नळ जोड फिटर यांचे अहवालानुसार , मुं. प्रां. म.न.पा. अधिनियम सन १९४९ चे कलम ४८५ नुसार पाणीपट्टी बील रद्द करणे संयुक्तीक वाटते.

अ.ले.प./ मु.ले.प :- प्रस्तावीत केल्याप्रमाणे पाणीपट्टी रू.१३७००/- रद्द करणेस मान्यतेकरीता (कलम ४८५)

मा.उपायुक्त (कर ) साहेब :- जा.क्र. सा.प्र.वि. २११३ दि.२०/९/२०१० नुसार पाहणी करून सादर करा.

मा.उपायुक्त साहेब :- सोबत समितीचा पाहणी अहवाल सादर केलेला आहे. सदर विषय मा. स्था. स. पुढे निर्णय घेणेबाबत मान्यतेस सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- श्रीमती शेख रईसा अब्दुला शकुर यांचे घरास चुकून आकारलेली पाणीपट्टी निर्लेखित करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- नळ कनेक्शन नसतांना आकारणी करण्यांत येते व प्रस्ताव मंजूरीसाठी स्थायी समितीकडेस पाठविणेत येतात अशी चुकून पाणीपट्टीची आकारणी कशी केली जाते.

प्रभाग अधिकारी प्र.स. क्र. ३, श्री. वर्मा के.सी. :- नळ कनेक्शनचा सर्व्हे केला होता. त्यामध्ये पाणी पट्टीची आकारणी केली आहे.

मा.श्री. डागवाले कि. आ. / मा.श्री. भोसले ग.पुं. :- सर्व्हे मध्ये किती बोगस नळ कनेक्शन आढळली.

प्रभाग अधिकारी प्र.स.क्र. ३ ,श्री. वर्मा के.सी. :- १४०० नळ कनेक्शन सापडले होते.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- सर्व्हे उगीच केला आकारणी कधी पासून केली आहे.

मा.श्री. डागवाले कि. आ. :- एवढया मोठया शहरात फक्त १४०० कनेक्शन सापडले

प्रभाग अधिकारी प्र.स क्र ३ श्री. वर्मा के.सी :- सन २००३ साली सर्व्हे केला होता तेव्हा पासून पाणीपट्टीची आकारणी आहे.

मा.सौ. गंधे सु. मो. व मा.सौ. गायकवाड नि. व. :- प्रस्तावास एवढा उशिर का?

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- पाणीपट्टी निर्लेखित करणेचे प्रस्ताव प्रकरणी एक समिती नेमलेली आहे त्या समिती मार्फत जागेचा पहाणी करून त्यानंतर प्रस्ताव स्थायी समितीकडेस मंजूरीसाठी पाठविलेले आहेत.

मा.श्री. भोसले ग. पुं. :- पाणीपट्टी निर्लेखित करणेचे विषय क्रमांक १७ ते २२ चे ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यांत यावे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- विषय क्रमांक १७ ते २२ मंजूर करण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक १७ ते २२ चे ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावे.

**<u>ठराव :-</u>** श्रीमती शेख रईसा अब्दुला शकुर, रा. घर नं.१/२ वाबळे कॉलनी मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये १३,७००/-(रूपये तेरा हजार सातशे फक्त) वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ५२३ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १८ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - १८ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. दत्तात्रय नारायण शिंदे , रा. घर नं.६ , ड्रिमॅलन्ड सोसायटी मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००३-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये १०,५००/- वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ६५१ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रभाग समिती क्र. ३ (झेंडीगेट) दि. / /२०१०

विषय- नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

संदर्भ :- श्री. दत्तात्रय नारायण शिंदे यांचा दि.९/३/२०१० रोजीचा अर्ज

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री.दत्तात्रय नारायण शिंदे , रा. ड्रीमलॅन्ड सोसा. घर नं.६ वॉर्ड क्र.८५ बील नं. ६५१ , मुकुंदनगर अ.नगर यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केलेली आहे की, सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही २००३ पासुन अचानक पाणीपट्टी आकारणी करून बील देण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यांत यावे अशी विनंती केलेली आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे यांना सादर करणेबाबत सांगितले असता त्यांनी श्री. दत्तात्रय नारायण शिंदे , रा.- ड्रीम लॅन्ड सोसा. घर नं.६ यांच्या घराची नळ कनेक्शची दि.१८/३/२०१० रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळून येत नाही, आस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दि.१८/३/२०१० रोजी इकडेस सादर केलेला आहे.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.-३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे यांचे पहाणी अहवालानुसार चुकून लागलेली पाणीपट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणीपट्टीची डिमांड रद्द करणे संयुक्तीक वाटते. सबब आदेशार्थ सादर.

सदर घराची पाणीपट्टी सन २००३-२०१० अखेर दहा हजार पाचशे रू. दर्शविण्यांत आली आहे.

येणेप्रमाणे वसुली मदतनीस वॉर्ड क्र.८५यांचा अहवाल असे.

--**--

कर निरिक्षक :- वसुली मदतनीस यांच्या अहवालाचे अवलोकन केले. मुं. प्रां. म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणीपट्टीची डिमांड रद्द करणे उचित वाटते.

प्रभाग अधिकारी :- प्रभागातील कर निरीक्षक यांचे रिपोर्टास सहमत

मु. ले. प. :- प्रस्तावीत "अ" प्रमाणे पाणीपट्टी मागणी रद्द करणेत यावी.

मा.उपायुक्त (कर) :- "अ" प्रस्तावीतनुसार मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवणे योग्य.

मा.आयुक्त साहेब :- अफेडेव्हीट घ्यावे. दिनांक २७/७/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**<u>ठराव :-</u>** श्री. दत्तात्रय नारायण शिंदे , रा. घर नं.६, ड्रिमॅलन्ड सोसायटी मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००३-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये १०,५००/- (रूपये दहा हजार पाचशे फक्त)वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ६५१ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १९ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - १९ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** सौ. बहार अंजुम वाहब सय्यद, रा. घर नं. सी-१, सी-२ वाबळे कॉलनी मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये २०,२१२/- वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ३९६ व ३९७ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रभाग समिती क्र. ३ (झेंडीगेट) दि. / /२०१०

विषय- नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

संदर्भ :- सौ.बहार अंजुम वाहब सय्यद यांचा दिनांक २२/२/२०१० रोजीचा अर्ज

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, सौ.बहार अंजुम वाहब सय्यद रा- वाबळे कॉलनी, घर नं. सी-१, सी-२ वॉर्ड क्र.८५ बील नं. ३९६ व ३९७, मुकुंदनगर अ.नगर यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केलेली आहे की, सौ. प्रमीला वसंतराव टकले रा. वाबळे कॉलनी, घर नं. सी-१, सी-२ यांचे घर खरेदी केले असुन सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही सन २००२ पासून अचानक पाणीपट्टीची आकारणी करून बील देण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यात यावे" अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड क्र.८५ मध्ये बील नं. ३९६ वर श्री. संपत बाबुराव टकले यांचे कडे सन २००९-२०१० अखेर घरपट्टी रू.४,४५६/- व पाणी पट्टी रू.१२,५५४/- असे दोन्ही मिळुन रू. १७,०१०/- इतकी बाकी आहे. तसेच बील नं. ३९७ वर सौ. प्रमीला वसंतराव टकले या नावाने घरपट्टी रू.७,६५८/- व पाणीपट्टी रू.१२,५५४/- असे दोन्ही मिळून रू. २०,२१२/- इतकी थकबाकी आहे, अर्जदार सौ. बहार अंजुम वाहब सय्यद यांनी बील नं. ३९६ सी-१ श्री. संपत बाबुराव टकले या नावाचे मालमत्ता खरेदी केलेली असुन सदर मालतत्ते वर सौ. बहार अंजुम वाहब सय्यद यांचे नाव लागलेले आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही या बाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे यांना सादर करणेबाबत सांगितले असता त्यांनी सौ. प्रमीला वसंतराव टकले रा. वाबळे कॉलनी ,घर नं. सी-२ यांच्या घराची नळ कनेक्शची दि.१८/३/२०१० रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळून येत नाही, आस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दि.१८/३/२०१० रोजी इकडेस सादर केलेला आहे. तसेच शहर अभियंता साहेब यांचे पहाणी अहवालानुसार मुंकुदनगर येथील वाबळे कॉलनी मधील ब्लॉक नं. सी-२ येथे पहाणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळून आलेले नाही./**अ**

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.-३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे व शहर अभियंता यांचे पहाणी अहवालानुसार चुकून लागलेली पाणीपट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणीपट्टीची डिमांड रद्द करणे सयुंक्तीक वाटते. सबब आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे वसुली लिपिक मदतनीस वॉर्ड क्र.८५ यांचा अहवाल असे.

--**--

कर निरिक्षक :- वसुली मदतनीस व नळ जोड फिटर यांच्या अहवालाचे अवलोकन केले त्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणीपट्टी डिमांड रद्द करणे उचित वाटते.

प्रभाग अधिकारी :- मा. सहाय्यक कर मुल्यांकन अधिकारी

मा.सहाय्यक कर मुल्यांकन अधिकारी :- प्रभाग अधिकारी यांचेकडेस पाणीपुरवठा विभागाकडील डिमांड रजिष्टरला नोंद आहे किंवा नाही याबाबत खात्री करून सादर करा.

फेर सादर,

उपरोक्त नुसार पाणी पुरवठयाचे अभिलेख (डिमांड रजिस्टर) सन २००३ ते २००४ पासून ची दिनांक २३ व २४/८/१० रोजी तपासणी केली. सदर नावाची नोंद अभिलेखात आढळून आली नाही आदेशार्थ सादर.

प्रभाग अधिकारी :- मा.स.क.मु. अधिकारी

सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी :- सादर, वसुली लिपिक व नळजोड फिटर यांचे समक्ष ठिकाणी स्थळ पाहणी केली असता बील नं. ३९७ सी-२ या मिळकती मध्ये १/२" नळकनेक्शन आढळून आले नाही. व पाणी पुरवठा विभागाकडील डिमांड रजिष्टर सन २००४ पासुन पाहिले असता नळ कनेक्शन घेतल्याची नोंद आढळून आली नाही. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणीपट्टीची डिमांड रू.१२,५५४/- रद्द करणेबाबत मा.स्थायी समिती पुढे ठेवणे उचित वाटते.

मुख्य लेखा परिक्षक :- सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचे शिफारशी प्रमाणे मान्यता देण्यास हरकत नाही.

मा. उपायुक्त (कर) साहेब :- चुकीने आकारणी केलेली रक्कम रूपये २०२१२/- पाणीपट्टीची रक्कम रद्द करणेबाबतचा विषया स्थायी समितीसमोर चर्चेसाठी ठेवणे यावा. मात्र अस सर्व विषय एकत्रित ठेवणे योग्य राहील मंजूरीस्तव.

मा.आयुक्त साहेब :- कृपया चर्चा करा, चर्चा केली मा.स्थायी समितीपुढे ठेवा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>ठराव :-</u>** सौ. बहार अंजुम वाहब सय्यद, रा. घर नं. सी-१, सी-२ वाबळे कॉलनी मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये २०,२१२/- (रूपये वीस हजार दोनशे बारा फक्त) वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ३९६ व ३९७ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक. सही /

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर. सही /-

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २० मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - २० मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. शेख सलाउद्दीन इस्माईल, रा. घर नं.४१/४३ हमीद पार्क मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये १२,११२/- वॉर्ड क्र.८८ बील क्रमांक ४५५ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रभाग समिती क्र. ३ (झेंडीगेट) दि.२९/४/२०१०

विषय- नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

संदर्भ :- श्री.शेख सलाउद्दीन इस्माईल यांचा दिनांक २१/१/२००९ रोजीचा अर्ज

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री. शेख सलाउद्दीन इस्माईल , रा. हमीदपार्क, मुंकुदनगर घर नं.४१/४३ अ.नगर यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केलेली आहे की, सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही सदर घराला सन २००३ पासून अचानक पाणीपट्टी आकारून प्रथमच सन २००९-२०१० मध्ये अचानक पाणीपट्टीची आकारणी करून बील देण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यांत यावे. अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड क्र.८८ बि.क्र. ४५५ वर श्री. शेख सलाउद्दीन इस्माईल यांची मिळकत असुन त्यांच्या नावे सन २००९-२०१० अखेर घरपट्टी रू. नील व पाणीपट्टी रू.१२,११२/- असे दोन्ही मिळुन रू.१२,११२/- इतकी थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे यांना सादर करणेबाबत सांगितले असता त्यांनी श्री. शेख सलाउद्दीन इस्माईल , रा. हमीदपार्क,मुंकुंदनगर घर नं. ४१/४३ यांच्या घराची नळ कनेक्शनची दि. ७/११/२००९रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळून येत नाही, अस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दि.७/११/२००९ रोजी इकडेस सादर केलेला आहे.

सन २००४-०५ मध्ये माजी सैनिक यांच्या संस्थेने महानगरपालिकेतील हद्दतीतील अनाधिकृत पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शनचे सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने केल्याचे आढळते.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.३ मधील पाणी पुरवठा फिटर श्री. ससाणे यांच्या अहवालानुसार चुकून लागलेली पाणी पट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणी पट्टीचे बील रद्द करणे संयुक्तीक वाटते. सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक मदतनीस यांचा अहवाल असे.

--**--

कर निरिक्षक :- वसूली मदतनीस व नळजोड फिटर यांचे अहवालाप्रमाणे पुढील आदेशास्तव सादर.

अं.ले.प. :- प्रभाग अधिकारी आपला स्वंयस्पष्ट अहवालासह सादर करा.

फेरसादर,

वॉर्ड मदतनीस अर्जाचे अवलोकन केले कर निरीक्षक यांचे अभिप्रायास सहमत मुं.प्रां. मनपा अधि. १९४९ चे कलम १५२ अनुसार मान्यतेस सादर.

मुख्य लेखा  परिक्षक :- रजेवर

मुख लेखा अधिकारी :-  पाणी पुरवठा फिटर यांचा दि.७/११/२००९ चा अहवाल पाहता नळ कनेक्शन नसल्याने पाणी बील रद्द करणे योग्य तथापि आदेशार्थ.

मा.उपायुक्त साहेब :- १] प्रस्तावीत विषयी मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव निर्णयार्थ ठेवुन

२] चुकीची आकारणी करणारे तत्कालीन संबंधीत कर्मचारी यांचे विरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही आस्थापना विभागामार्फत प्रस्तावीत करणे योग्य.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दिनांक १४/६/२०१०

प्रभाग अधिकारी :- आस्था. प्रमुख मा.आयुक्त सोा. यांचे आदेशानुसार पुढील आवश्यक त्या कार्यवाही साठी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ठराव :-** श्री. शेख सलाउद्दीन इस्माईल, रा. घर नं.४१/४३ हमीद पार्क मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर घरपट्टी,पाणीपट्टी रूपये १२,११२/- (रूपये बारा हजार एकशे बारा फक्त )वॉर्ड क्र.८८ बील क्रमांक ४५५ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित  करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक.        सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम.  सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २१ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - २१ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. शेख सलीम अल्लाबक्ष, रा. घर नं.५९ बी हिनापार्क मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये ७५००/- वॉर्ड क्र.८८ बील क्रमांक २३८ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रभाग समिती क्र. ३ (झेंडीगेट) दि.२८/४/२०१०

विषय- नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.
संदर्भ :- श्री.शेख सलीम अल्लाबक्ष यांचा दिनांक २/११/२००७ रोजीचा अर्ज

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्री.शेख सलीम अल्लाबक्ष, रा. हिनापार्क, मुंकुदनगर घर नं. ५९ बी अ.नगर यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केलेली आहे की, सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही सदर घराला सन २००६ पासून अचानक पाणीपट्टी आकारून प्रथमच सन २००९-२०१० मध्ये अचानक पाणीपट्टीची आकारणी करून बील देण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यांत यावे. अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड क्र.८८ बि.क्र. २३८ वर श्री.शेख सलीम अल्लाबक्ष यांची मिळकत असुन त्यांच्या नावे सन २००९-२०१०अखेर घरपट्टी रू.२५८०/- व पाणीपट्टी रू.७५००/- असे दोन्ही मिळुन रू.१०,०८०/- इतकी थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे यांना सादर करणेबाबत सांगितले असता त्यांनी श्री.शेख सलीम अल्लाबक्ष, रा. हिनापार्क,मुंकुंदनगर घर नं. ५९ बी यांच्या घराची नळ कनेक्शनची दि. १८/३/२०१०रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळून येत नाही, आस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दि.१८/३/२०१० रोजी इकडेस सादर केलेला आहे.

सन २००३-०४ मध्ये माजी सैनिक यांच्या संस्थेने महानगरपालिकेतील हद्दतीतील अनाधिकृत पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शनचे सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने केल्याचे आढळते.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.३ मधील पाणी पुरवठा फिटर श्री. ससाणे यांच्या अहवालानुसार चुकून लागलेली पाणी पट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार पाणी पट्टीचे बील रद्द करणे संयुक्तीक वाटते. सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक मदतनीस क्र.८८ यांचा अहवाल असे.

--**--

कर निरिक्षक :- वसूली मदतनीस व नळजोड फिटर यांच्या अहवालानुसार पुढील आदेशास्तव सादर.
मा. प्रभाग अधिकारी :- सहमत दर्शक सही
अंतर्गत लेखा परिक्षक :- प्रभाग अधिकारी आपला स्वंयस्पष्ट अहवालासह सादर करा.

फेर सादर,

वॉर्ड (मदतनीस) चा रिपोर्ट व कर निरीक्षक यांचे अभिप्रायास सहमत मुं. प्रां. मनपा अधि. १९४९ चे कलम १५२ अनुसार कार्यवाही होणे अपेक्षीत

मुख्य लेखा परिक्षक :- रजवेर

नळ फिटर यांनी दि.२/११/०७ रोजी नळ बंद असल्याचा अहवाल दिलेला दिसुन येतो त्यानंतर २ वर्षापे पाणीपट्टी रद्द करणेची कार्यवाहीची टिपणी कशी ठेवला ? खुलासा सादर करावा.

फेरसादर,

प्रभाग अधिकारी प्र.स. क्र.३ :- अर्जदार यांनी त्यांच्या मालकीच्या घर नं. ५९ बी हिनापार्क , मुकुंदनगर वॉ. नं.८८ या जागेमध्ये पिण्याच्या पाण्याचे नळ कनेक्शन नसतांना बील आस्था. बाबत दि.२/११/२००७ रोजी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जावर सन २००७ मध्ये या विभागामध्ये कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि जा.क्र./सा.प्र.वि./पी.ए./३७२४ दि.२२/२/२०१० अन्वये अर्जदार हे दि.२०/२/२००१० रोजी मा. उपायुक्त (कर) यांचा समक्ष भेट घेवुन तक्रार केलेली आहे. सदर तक्रारीवरून कार्यवाही करून सदर अहवाल दि.२८/४/२०१० रोजी मा. उपायुक्त (कर) सोा. यांचे आदेशास्तव सादर केला आहे.

मुख्य लेखा परिक्षक :- वरील "अ" प्रमाणे पाणीपट्टी रक्कम रू.७५००/- माफ करणेत यावी.

मा. उपायुक्त (कर) :- मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे १५२ च्या तरतुदीनुसार सादर करा.

कर निरिक्षक :- फेरसादर, अर्जदार श्री. शेख सलीम अल्लाबक्ष घर नं. ५९ बी हिना पार्क , मुंकुंदनगर वॉ.नं. ८८ बी.नं. २३८ या मिळकतीवर नळजोड नसतांना संगणकावर नळ जोड दाखविण्यांत आले आहे. सन २००३-०४ मध्ये माजी सैनिक संस्थेने केलेले सर्व्हेक्षण (अनाधिकृत नळ जोडणी) हे चुकीच्या पध्दतीने केल्याचे आढळते. तसेच त्यावेळी असणार अधिकारी / कर्मचारी यांनी देखिल सदर अभिलेखांची छाननी न केल्यामुळे सदर चुक झाल्याचे आढळते करीता सदर प्रकरणास मुं. प्रा. मनपा अधि.१९४९ चे कलम १५२ लागू नाही.

सबब मुं. प्रां. म न पा अधिनियम १९४९ चे कलम ४८५(१) अनुसार दुरूस्ती करणे बाबत आदेशार्थ सादर.

मा.प्रभाग अधिकारी :- कर निरीक्षक यांचे अहवालास सहमत

मुख्य लेखा परिक्षक :- कामाचे सर्वेक्षण हे चूकीचे झाल्याने मनपा अधिनियम कलम ४८५(१) नुसार कर दुरूस्ती करणेस मान्यतेस्तव

मा. उपायुक्त (कर) :- CAFO Pl. discase.

मुख्य ले. परिक्षक व मुख्य ले. अधिकारी :- या प्रकरणावर मा.उपायुक्त (कर) यांचेशी समक्ष चर्चा झाली मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम नियम ४८५ (१) पाहता आकारणी इ. उपचार दोष याबाबत तरतूद केली आहे यामध्ये नियमानुसार आकारणी दस्तऐवजात दोष असल्यास ते शक्य तेथवर दुरूस्त करता येईल. या खाली चुकीची पाणीपट्टी आकारणी मा.उपायुक्त (कर) यांचे मंजूरीने रू.७५००/- कमी करता येईल. अधिनियम कलम १५२ कर निर्लेखित यामध्ये आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने कोणत्याही कराबद्दल किंवा त्यासाठीच्या खर्चाबद्दल येणे रक्कम त्यांच्या मते वसूल होणे योग्य नसेल त्यावेळी निर्लेखित करता येईल

परंतु सदरचे प्रकरण हे  याखाली समाविष्ट होणार नाही. तरी वरील अधिनियम कलम १५२ नुसार चुकीची पाणीपट्टी  आकारणी रू.७५००/- कमी करणेस मान्यता घ्यावी.

मा.उपायुक्त (कर) :- "अ" प्रस्तावीतनुसार मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवणे योग्य

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.९/८/२०१०

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ठराव :-** श्री. शेख  सलीम अल्लाबक्ष, रा. घर नं.५९ बी हिनापार्क मुकुंदनगर यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये ७५००/- (रूपये सात हजार पाचशे फक्त) वॉर्ड क्र.८८ बील क्रमांक २३८ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक.            सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम.   सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २२ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - २२ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** श्रीमती जाहिदाबानो हमीदखान पठाण , रा. घर नं.१६, ड्रिम लॅन्ड सोसायटी बॉम्बे हॉस्पीटल मागे यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकुन आकारलेली सन २००९-२०१० अखेर पाणीपट्टी रूपये ७५००/- वॉर्ड क्र.८५ बील क्रमांक ६६१ चे पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. प्रभाग समिती क्र. ३ (झेंडीगेट) दि. / /२०१०

विषय- नळ कनेक्शन नसतांना पाणीपट्टीचे बील आल्याबाबत.

संदर्भ :- श्रीमती जाहिराबानो हमीदखान पठाण यांचा दिनांक १९/३/२००९ रोजीचा अर्ज सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, श्रीमती जाहिदाबानो हमीदखान पठाण,रा.ड्रीम लॅन्ड सोसा. बॉम्बे हॉस्पीटला मागे घर नं. १६ अ.नगर यांनी इकडेस अर्ज देवुन विनंती केलेली आहे की, सदर घराला नळ कनेक्शन नसतांनाही सदर घराला सन २०० पासून अचानक पाणीपट्टी आकारून प्रथमच सन २००९-२०१० मध्ये अचानक पाणीपट्टीची आकारणी करून बील देण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणची समक्ष पाहणी करून सदरचे चुकीचे बील रद्द करण्यांत यावे. अशी विनंती केलेली आहे.

वॉर्ड क्र.८५ बि.क्र. ६६१ वर श्रीमती जाहिराबानो हमीदखान पठाण, यांची मिळकत असुन त्यांच्या नावे सन २००९-२०१०अखेर घरपट्टी रू. Nil व पाणीपट्टी रू.७५००/- असे दोन्ही मिळुन रू.७५००/ इतकी थकबाकी आहे.

अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल प्रभाग समिती क्र.३ मधील पाणीपुरवठा फिटर श्री. ससाणे यांना सादर करणेबाबत सांगितले असता त्यांनी श्रीमती जाहिराबानो हमीदखान पठाण, रा. ड्रीम लॅन्ड सोसा.मुकुंदनगर घर नं. १६ यांच्या घराची नळ कनेक्शनची दि.२५/३/२००९रोजी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी नळ कनेक्शन आढळून येत नाही, आस्तित्वात नाही या बाबतचा अहवाल दि.२५/३/२००९ रोजी इकडेस सादर केलेला आहे.

सन २००४-०५ मध्ये माजी सैनिक यांच्या संस्थेने महानगरपालिकेतील हद्दतीतील अनाधिकृत पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शनचे सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने केल्याचे आढळते.

तरी सदर ठिकाणी नळ कनेक्शन नसल्याने व प्रभाग समिती क्र.३ मधील पाणी पुरवठा फिटर श्री. ससाणे यांच्या अहवालानुसार चुकून लागलेली पाणी पट्टी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८५ नुसार पाणी पट्टीचे बील रद्द करणे संयुक्तीक वाटते. सबब आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक मदतनीस क्र.८५ यांचा अहवाल असे.

--**--

कर निरिक्षक :- वसूली मदतनीस व नळजोड फिटर यांच्या अहवालानुसार मुं. प्रां. म न पा अधिनियम १९४९ चे कलम ४८५ नुसार कार्यवाहीस्तव आदेशार्थ सादर.

मा. प्रभाग अधिकारी :- उपरोक्त रिपोर्टानुसार कार्यवाही होणे उचित वाटते.

स.क.मु.अ. :- जा.क्र. सा.प्र.वि. २११३दि.२०/९/२०१० चे आदेशानुसार कार्यवाही करण्यांत यावी.

मा. उपायुक्त साहेब :- बिलाची रक्कम किती ?
प्रभाग अधिकारी :- फेर सादर सन २०१०-११अखेर रूपये ९०००/- निर्लेखित करण्यांस आदेशार्थ सादर.
मुख्य लेखा परिक्षक :- चुकीची लागलेली पाणीपट्टीची रक्कम रू.९०००/- रद्द / निर्लेखित करणेचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवणेत यावा.
मा.उपायुक्त साहेब :- प्रस्तावीत चुकीची लागलेली पाणीपट्टी निर्लेखित करणेबाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव ठेवणे बाबत मान्यतेस सादर.
मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२८/३/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**ठराव :-** श्रीमती जाहिदाबानो हमीदखान पठाण , रा. घर नं.१६, ड्रिम लॅन्ड सोसायटी बॉम्बे हॉस्पीटल मागे यांचे वॉर्ड क्रमांक ८५ बील क्रमांक ६६१ यांचे घरास नळ कनेक्शन नसतांना त्यांना चुकून आकारलेली सन २००९-२०११ अखेर पाणीपट्टीचे बील निर्लेखित करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २३ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - २३ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर कंत्राटी करारानुसार अटी शर्ती प्रमाणे दरमहा रूपये १३,०००/- फक्तचे मानधनावर दि.३/५/२०११ पासून सहामहिन्याकरिता केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्था. जा.क्र. वर्क. ४ दि.२/५/२०११

विषय- रक्तपेढी विभागाकरिता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.

सादर,

रक्तपेढी विभाग जा.क्र. २ दिनांक १५/४/२०११ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "रक्तपेढी विभागातील मोरे पल्लवी दगडू यांची जा.क्र. आस्थापना ३०८ दिनांक २७/४/२०१० अन्वये नेमणूक करण्यांत आलेली आहे. त्यांचे काम समाधानकारक असल्याने त्यांना पुढील कालावधीसाठी खंड देवून पुर्नेनियुक्ती आदेश देणे बाबत." नमुद करून सुचित केलेले आहे.

तरी रक्तपेढी विभाग जा.क्र. २ दिनांक १५/४/२०११ च्या प्रस्तावाच्या अनुंषगाने रक्तपेढी विभागामध्ये मोरे पल्लवी दगडू यांची जा.क्र. आस्था. / कंत्राटी करार नेमणूक ३०४ दिनांक ०२/५/२०११ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १३,०००/-(अक्षरी रू. तेरा हजार मात्र) या मानधनावर दिनांक ३/५/२०११ पासून सहा महिन्या करीता केलेल्या करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे रक्त पेढी विभागाकरिता डॉ. मोरे पल्लवी दगडू यांची लॉब टेक्नीशियन या पदावर कंत्राटी करारानुसार केलेल्या नेमणूकीस अखेर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- त्या काम करीत असल्याने ऑफिस रिपोर्टानुसार अखेर मंजूरी देणेत यावी.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देणेत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते अखेर मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता मोरे पल्लवी दगडू यांची तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन या पदावर कंत्राटी करारानुसार अटी शर्ती प्रमाणे दरमहा रूपये १३,०००/-(रूपये तेरा हजार फक्त) चे मानधनावर दि.३/५/२०११ पासून सहामहिन्याकरिता केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २४ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - २४ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नमुद केलेली कर्तव्ये व अधिकार मा.आयुक्त साहेबांना प्राप्त आहेत त्यापैकी अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य घनकचरा व्यवस्थापन विभागातील कचरा संकलन व वाहतुक करणे कामी वापरण्यांत येणा-या वाहनांची देखभाल व दुरूस्ती इत्यादी खर्चासाठी रूपये २०००/- पर्यत खर्च करण्याचे अधिकार प्रभाग अधिकारी यांना प्रदान करणेत येत असलेबाबत मा.आयुक्त साहेब यांचा आरोग्य / घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.१९ दि.२६/४/२०११ रोजीचा आदेश अखेर मंजूरीस.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका अ.नगर आरोग्य विभाग / घनकचरा विभाग
जा.क्र. १९ दिनांक २६/४/२०११

**आदेश**

विषय-कचरा गाडीचे किरकोळ दुरूस्ती बाबत.

आदेशित करण्यांत येते की, आयुक्त यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नमुद केलेली कर्तव्य व अधिकार सुपुर्त करण्यांत आलेली आहेत. अहमदनगर महानगरपालिकेतील आरोग्य / घनकचरा व्यवस्थापन विभागातील कचरा संकलन व वाहतुक करणेकामी वापरण्यात येणा-या वाहनांची देखभाल व दुरूस्ती करणे इत्यादीच्या खर्चासाठी प्रभाग अधिकारी यांना दरमहा रक्कम रूपये २०००/-(अक्षरी रक्कम रू. दोन हजार मात्र) पर्यत खर्च करण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९ अन्वये प्रदान करण्यात येत आहेत.

सदरचे अधिकार वापरतांना महानगरपालिकेची आर्थिक स्थिती आणि कामाची निकड व अत्यावश्यक सेवा सुविधा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३ विचारात घेवुन खर्चास मंजुरी देणे बाबत कार्यवाही करावी. तसेच महाराष्ट्र लेखा संहिता मधील तरतुदींचे पालन करण्यांत यावे.

येणेप्रमाणे मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका ,अ.नगर यांचे आदेश पत्र
सबब आदेश मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे आरोग्य/ घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील वाहनांची देखभाल व दुरूस्ती साठी रूपये२,०००/- पर्यत खर्च करण्यांचे अधिकार प्रभाग अधिकारी यांना देणेस अखेर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- अखेर मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- अखेर मंजूरी देणेत यावी.

मा.सभापती साहेब :- प्रभाग अधिकारी यांना आरोग्य व घन कचरा व्यवस्थापन विभागाकडील वाहनांची देखभाल व दुरूस्ती साठी रूपये २,०००/- पर्यत खर्चाचे अधिकार प्रदान करणेस सर्वानुमते अखेर मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नमुद केलेली कर्तव्ये व अधिकार मा.आयुक्त साहेबांना प्राप्त आहेत त्यापैकी अहमदनगर महानगरपालिकेचे आरोग्य/ घनकचरा व्यवस्थापन विभागातील कचरा संकलन व वाहतुक करणे कामी वापरण्यांत येणा-या वाहनांची देखभाल व दुरूस्ती इत्यादी खर्चासाठी रूपये २०००/- (रूपये दोन हजार फक्त) पर्यत खर्च करण्याचे अधिकार प्रभाग अधिकारी यांना प्रदान करणेस अखेर मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक-२५ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक -२५ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक,प्रा.श्री. एन.बी. मिसाळ यांनी स्पर्धा परिक्षा केंद्रात येणा-या विषयतज्ञ, व्याख्याते यांना प्रतितास मानधन वाढवून देणे बाबत केलेला अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर** :- विषय- मानधनात वाढ करणे बाबत.

सादर,

विनंतीपुर्वक अहवाल स्पर्धा परीक्षा प्रशिक्षा विभागामार्फत देण्यात येतो की, प्रा.एन.बी. मिसाळ, संचालक , स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर महानगरपालिका यांनी मानधन रू.२००/- ऐवजी रू.५००/- प्रतितास करणे व आयकर (TDS) कपात केली जावू नये म्हणून दिनांक २०/०८/२०१० रोजी अर्ज केलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने सावेडी क्रीडा संकुल या ठिकाणी सन २००७ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यांत येणा-या विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थीनींना मोफत मार्गदर्शन केले जाते व सदर केंद्रावर वेगवेगळया विषय तंत्रज्ञान बाबत व्याख्याने देणेसाठी मार्गदर्शन करणेसाठी प्राध्यापकांना सन २००७ पासून प्रतितास रू.२००/- इतके मानधन दिले जाते.

सन २००७ पासून सदर मानधनात वाढ केलेली नाही यशदा, पुणे येथील स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्रात प्रतितास रू.५००/- ते रू.७००/- इतके मानधन दिले जाते. त्यामुळे महानगरपालिकेच्या स्पर्धा परीक्षा केंद्रात येणा-या विषयतज्ञ, व्याख्याते यांना यापुढे रू.५००/- इतके प्रतितास मानधन देण्यात यावे व आयकर (TDS) कपात करू नये (TDS) कपात केल्यास व कमी मानधन असल्याने व्याख्याते, विषयतज्ञ उपलब्ध होवु शकत नाही असे त्यांनी अर्जात नमुद केलेले आहे.

मा.मुख्यलेखापरिक्षक सो. यांचा अभिप्राय की, प्रतितास रू.४००/- इतके मानधन मंजूर करावे व मानधनावर आयकर कपात करू नये. मंजूरीसाठी व धोरणात्मक बाब असल्याने स्थायी समितीकडे विषय चर्चेसाठी पाठवावा.

मा. मुख्यलेखाधिकारी सो. यांचा अभिप्राय की, प्रतितास रू.३००/- इतके मानधन करावे मंजूरीसाठी विषय स्थायी समिती समोर ठेवावा.

मा.उपायुक्त सो. यांचा अभिप्राय की, मान्येतस्तव सादर.

मा.आयुक्त सो. यांचा अभिप्राय की, चर्चा केली 'अ' नुसार मान्य

सबब सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सविनय सादर.

येणेप्रमाणे प्रकल्प संचालक, स्पर्धा परीक्षा केंद्र यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्रात येणारे विषयतज्ञ, व्याख्याते यांना प्रतितास देणेत येणारे मानधन वाढवून देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि. आ. :- त्यांना पूर्वी किती मानधन देणेत येत होते.

सहा.आयुक्त श्री. परशरामी साहेब :- महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्रावर वेगवेगळे विषयावर व्याख्याते देण्यासाठी येणारे प्राद्यापकांना सन २००७ सालापासून रूपये २००/- प्रतितास याप्रमाणे मानधन दिले जाते. मुख्य लेखाधिकारी यांनी रूपये ३००/- प्रतितास इतके मानधन देणेत यावे अशा बाबत शिफारस केलेली आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- प्रतितास मानधन रूपये ३००/- प्रमाणे देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. डागवाले कि. आ. :- रूपये ३००/- प्रमाणे मानधन देणेस मंजूरी देणेत यावी.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्रात येणारे विषयतज्ञ, व्याख्याते यांना प्रतितास मानधन रूपये तीनशे प्रमाणे देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठरावः-** अहमदनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक,प्रा.श्री. एन.बी. मिसाळ यांनी स्पर्धा परिक्षा केंद्रात येणा-या विषयतज्ञ, व्याख्याते यांना प्रतितास मानधन रूपये ३००/- (रूपये तीनशे फक्त) प्रमाणे अदा करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक-२६ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक -२६ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागामध्ये स्वयंचलित यांत्रिकी, कनिष्ठ अभियंता या पदावर श्री.स्वप्निल बाळकृष्ण पवार यांना दरमहा रू.१०,०००/-फक्तचे मानधनावर कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सहामहिन्या करिता नेमणूक देणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर** :- अ.नगर म.न.पा आस्था. जा.क्र. वर्क १५ दिनांक ७/६/२०११

विषय- मोटर व्हेईकल विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदी अटी व शर्ती प्रमाणे श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबत.

सादर,

श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांनी दिनांक २२/३/२०११ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये "स्वयंचलित यांत्रिकी, कनिष्ठ अभियंता या पदावर मोटर व्हेईकल विभागामध्ये महानगरपालिकेच्या मालकीचे सर्व विभागाकडील वाहनांची दुरूस्ती बाबतचे काम पहाणे कामी नेमणूक आहे. ही मुदत ६ महिन्यासाठी होती. ती दिनांक ९/६/२०११ रोजी संपत आहे. या विभागामध्ये पुन्हा काम करण्याची इच्छा आहे. त्या अनुषंगाने सेवेत मुदतवाढ मिळावी" असे नमुद करून विनंती केलेली आहे. सदर अर्जावर मा.मॅकेनिकल इंजिनिअर यांनी जा.क्र. मो.व्हे. ११ दिनांक १०/५/२०११ रोजी " मनपा चे मो.व्हे. विभागात ॲटो इंजि. ची आवश्यकता असल्याने अर्जदार यांची विनंती मान्य करणेस हरकत नाही." असे नमुद करून शिफारस केलेली आहे.

तरी मा. मॅकेनिकल इंजिनिअर यांचेकडील जा.क्र.मो.व्हे.११दिनांक१०/५/२०११ च्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मोटर व्हेईकल विभागामध्ये कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता या पदी अटी व शर्ती प्रमाणे श्री. स्वप्निल बाळकृष्ण पवार यांची सहा महिन्या करीता रूपये १०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे बाबत मंजूरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागामध्ये स्वयंचलित यांत्रिकी, कनिष्ठ अभियंता या पदावर श्री. स्वप्निल पवार यांची नेमणूक देणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- मोटार व्हेईकल विभागास स्वयंचलित यांत्रिकी, कनिष्ठ अभियंत्याची आवश्यकता आहे का ?

मॅकेनिकल इंजि.श्री.निकम पी.जे. :- होय आवश्यकता आहे. तसेच पुढिल सहा महिन्याकरिता मुदतवाढ देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्टानुसार मोटार व्हेईकल विभागामध्ये स्वंयचलित यांत्रिकी, कनिष्ठ अभियंता या पदावर श्री. स्वप्निल पवार यांची मानधनावर नेमणूक देणेस कार्योत्तर मंजूरी देण्यांत यावी तसेच पुढिल सहा महिन्याकरीता त्यांना मुदतवाढ देणेस मंजूरी देणेत यावी.

मा.श्री. लोंढे सु. सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा तसेच पुढिल सहामहिन्याकरिता नेमणूक देण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा. श्री. स्वप्निल पवार यांना स्वंयचलित यांत्रिकी, कनिष्ठ अभियंता या पदावर पुढिल सहा महिन्याकरिता सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव:-**अहमदनगर महानगरपालिकेचे मोटार व्हेईकल विभागामध्ये स्वयंचलित यांत्रिकी, कनिष्ठ अभियंता या पदावर श्री.स्वप्निल बाळकृष्ण पवार यांना दरमहा रू.१०,०००/-(रूपये दहा हजार फक्त )चे मानधनावर कंत्राटीन करारानुसार नेमणूक देणेस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट. मंजूर,खर्च मंजूर.

तसेच पुढिल सहामहिन्याकरिता ही नेमणूक देण्यांस मंजूरी देणेत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक-२७ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक -२७ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्याकरिता वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची दिनांक १७/६/२०११ पासून सहा महिन्याकरिता दरमहा रूपये १०,०००/- फक्तचे मानधनावर कंत्राटी करारानुसार नेमणूक देणेस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- अ.नगर म.न.पा आस्था. जा.क्र. २२ दिनांक २१/६/२०११

विषय- फिरत्या दवाखान्या करीता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदावर अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार मानधनावर करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत.

सादर,

डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांनी दिनांक १९/५/२०११ रोजी अर्ज देवुन कंत्राटी करार नेमणूक वैद्यकीय अधिकारी (फिरता दवाखाना) या पदावर सहा महिन्या करीता केलेली असुन सदरचा कालावधी दिनांक १३/६/२०११ रोजी समाप्त होत आहे. फिरत्या दवाखान्यावर वैद्यकीय अधिकारी म्हणुन पुर्नेनेमणुक व्हावी. असे नमुद करून विनंती केलेली आहे.

सदरचा अर्जावर मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी बा.दे.दवाखाना व मा.प्र. आरोग्याधिकारी यांनी त्यांचेकडील जा.क्र. फिरता दवाखाना १०४ दिनांक २६/५/२०११ अन्वये पुर्नेनेमणूक होणेस विनंती व शिफारस बाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

तरी मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचे कडील प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या फिरत्या दवाखान्या करिता डॉ.श्री. सुरेश विलास घोलप यांची जा.क्र.आस्था./कंत्राटी करार नेमणुक ७३० दिनांक १६/०६/२०११ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकिय अधिकारी या पदावर नेमणूक आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १०,०००/-(अक्षरी रूपये दहा हजार मात्र) या मानधनावर दिनांक १७/६/२०११ पासून सहा महिन्या करीता केलेल्या करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्याकरिता वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ.श्री. सुरेश घोलप यांची सहामहिन्याकरिता मानधनावर नेमणूक देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. लोंढे सु. सो. :- ऑफिस रिपोर्टानुसार अखेर मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठरावः-**अहमदनगर महानगरपालिकेचे फिरत्या दवाखान्याकरिता वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ. श्री. सुरेश विलास घोलप यांची दिनांक १७/६/२०११पासून सहामहिन्याकरिता दरमहा रूपये १०,०००/- (रूपये दहा हजार फक्त) चे मानधनावर कंत्राटी करारानुसार नेमणूक देणेस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलीक सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक-२८ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक -२८ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मौजे सावेडी येथील नगररचना योजना क्रमांक ४ अंतीम भुखंड क्रमांक १२८सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल (फेज-१) मधील पहिले मजल्याचे हॉल क्रमांक४ अर्जदार सहाय्यक निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय यांना रूपये १४,००२/- फक्त (मालमत्ता करा विरहीत)दरमहा भाडे आकारून भाडे तत्वावर देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर** :- अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग दिनांक /१०/२०१०

विषय :- जिल्हाधिकारी कार्यालयास सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील जागा देणे बाबत.

सादर,

मा. नगररचनाकार मनपा , अहमदनगर यांनी पत्र क्र.३०३५ दि.१/११/२०१०अन्वये सहा. निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय यांचे दि.२९/१०/२०१० चे पत्र देवुन नरयो. क्र.४ मधील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील पहिल्या मजल्यावर असणा-या हॉलची मागणी संबंधीत संदर्भिय पत्राने या कार्यालयाने इकडेस केलेली आहे. त्या अनुषंगाने सदर ठिकाणी हॉल रिकामे असल्यास ते देणे बाबतची कार्यवाही आपल्या विभागामार्फत करण्यांत यावी. या प्रमाणे कळविणे आहे.

त्यानुसार अहमदनगर महापालिकेच्या मालकीच्या नरयो. क्र.४ मधील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील पहिल्या मजल्यावर हॉल क्र.४ हा रिक्त असुन सदरची जागेचे क्षेत्रफळ ८७.५१ चौ.मीटर असुन त्यांचे मासिक भाडे व इतर करासह भाडे मा. नगररचना यांचेकडून निश्चित होणे आवश्यक आहे.

उक्त जागा भाडे पट्टयाने देणे बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण-८ नगरपालिकेची मालमत्ता विनीयोग कलम ७९ (ब) मध्ये तरतुद असल्याने जिल्हाधिकारी कार्यालय मा. सहा. निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय यांना भाडे पट्टयाने देणे बाबत मा.स्थायी समिती सक्षम असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती महापालिका यांचेकडे योग्य मंजुरीकरीता पाठविणे बाबत आदेश होणेस विनंती आहे.

येणेप्रमाणे सहा.मुल्य निर्धारक करसंकलन अधिकारी करिता वरिष्ठ लिपिक करिता यांचा अहवाल असे.

--**--

मा.उपायुक्त साहेब :- नगररचनाकार यांचे अभिप्रायासह सादर करावे.

सहा. मुख्य निर्धारक कर संकलन अधिकारी :- फेरसादर, सोबत मा. नगररचनाकार यांचे अभिप्राय सोबत जोडले आहे. तरी पुढील आदेशार्थ सादर.

--**--

नगररचना विभाग
जा.क्र.टी.पी. ३०३५
दिनांक१/११/२०१०

प्रति,
मा. मार्केट विभाग प्रमुख,
महानगरपालिका अहमदनगर

विषय- जिल्हाधिकारी कार्यालयास सावित्रीबाई फुले व्यापारी सकुंलातील जागा देणे बाबत.
संदर्भ :- जा.क्र./कार्या./ सजिनि/४१११/२०१० सहा. निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय यांचे दि.२१/१०/१० रोजीचे पत्र

उपरोक्त विषयानुरूप मौजे सावेडी येथील नरयो क्र.४ मधील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुलातील पहिल्या मजल्यावर असणा-या हॉलची मागणी संबंधीत संदर्भित कार्यालयाने इकडेस केलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, सदर ठिकाणी हॉल रिकामे अल्यास ते देणेबाबतची कार्यवाही आपल्या विभागामार्फत करण्यात यावी. तसेच उपलब्ध नसल्यास परस्पर संबंधीत कार्यालयास कळविण्यांत यावे.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

--**--

सादर,

वरील संदर्भिय विषयान्वये मौजे सावेडी येथील नरयो क्र.४ मधील अंतिम भू. कं. १२८ मधील सावित्रीबाई व्यापारी फुले संकुलातील फेज-१ मधील पहिल्या मजल्यावरील हॉलचे (क्र.४) चे मुल्यांकन (भाडे मुल्य) खालीलप्रमाणे देत आहे.

सदर हॉलचे (हॉल क्र.४ ) क्षेत्र-

= 8.10 x9.20+4.33x3

= 87.51वर्ग मी. इतके येत आहे.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.महासभेने पारित केलेला ठराव क्र.५ दिनांक १५/३/२००८अन्वये सदर हॉलचे भाडे मुल्य १५०.००रू. प्रति चौ.मी. प्रति महिना इतके ठरविलेले आहे.

वरील हॉल क्र. ४ चे भाडे मुल्य खालीलप्रमाणे देत आहे.-

1] हॉलचे क्षेत्र = 87.51 चौ.मी.

2] भाडे मुल्य = 150.00 रू. प्रति चौ.मी. प्रति महिना

.: हॉल क्र. ४ चे भाडे मुल्य-

= 87.51 x 150.00

= 13127.00 रू. प्रति महिना

सदरचे भाडे हे मालमत्ता कराविरहित आहे.

सदरील सह. निबंधक कार्यालय हे सरकारी कार्यालय असल्याने व अनामत रकमेत पूर्ण सवलत देण्याचे ठरल्यास खालीलप्रमाणे भाडेमुल्य येईल.

अनामत रक्कम = २००० रू. प्रति चौ.मी.

( मा. महासभा ठराव क्र.५ दि.१५/३/२००८ अन्वये)

एकूण क्षेत्र = 87.51 चौ.मी.

एकूण अनामत रक्कम = 2000 x 87.51

= 1,75,020.00 रू.

वरील अनामत रक्कमेत दरसाल दर शेकडा 6%उत्पन्न गृहित धरल्यास कार्यालयाचे भाडे मुल्य

= 1,75,020 x 6 % = 10501.00

= 10501.00 रू. प्रति वर्ष

= 875.00 रू. प्रति महिना

त्यामुळे वरील हॉलच्या एकूण मासिक भाडे मुल्यात 875.00 रू. इतकी वाढ होईल त्यामुळे येणारे एकूण भाडे

= 13127.00+875.00

= 14002.00 रू. प्रति महिना

सबब अर्जदार यांसकडून मासिक भाडे 14002.00 रू. आकारणे योग्य होईल. मालमत्त कर, लाईट बील, इ. खर्च स्वतंत्र भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कमेत सवलत दिल्याने मासिक भाडयात काहीशी वाढ होत आहे.

तरी अर्जदार यांसकडून मालमत्ता कराविरहित 14002.00 रू. प्रति महिना इतके भाडे आकारणे योग्य होईल असे मत आहे.

येणेप्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

--**--

मुख्य लेखा परिक्षक व उपायुक्त (कर) :- मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयास प्रस्तावानुसार रू.14002/- (रू. चौदा हजार दोन फक्त) भाडे मंजूरीचा ( सावित्रीबाई फुले मार्केट पहिल्या माळयाकरीता) प्रस्ताव स्थायी समितीपुढे चर्चेसाठी ठेवणेत यावा.

मु.ले.प. :- रजेवर

मा.आयुक्त साहेब :- चर्चा करा. दिनांक १५/१/२०११ मा. स्थायी समिती पुढे पाठवा. दि. १६/३/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील पहिले मजल्याची हॉल भाडयाने देणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

मार्केट विभाग प्रमुख श्री. साबळे :- मा. महासभेचे ठरावानुसार अर्जदार सहाय्यक निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय यांना दरमहा भाडे रूपये १४,००२/- मालमत्ता करा विरहित भाडे आकारून सावेडी येथील सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल (फेज-१) मधील पहिले मजल्याचे हॉल क्रमांक ४ भाडे तत्वावर देणेस मंजूरीस्तव प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देणेत यावी.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे मौजे सावेडी येथील नगररचना योजना क्रमांक ४ अंतीम भुखंड क्रमांक १२८सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल (फेज-१) मधील पहिले मजल्याचे हॉल क्रमांक४ अर्जदार सहाय्यक निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय यांना रूपये १४,००२/- (रूपये चौदा हजार दोन फक्त) (मालमत्ता करा विरहीत)दरमहा भाडे आकारून भाडे तत्वावर देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव. सही /-

अनुमोदक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२

विषय क्रमांक-२९ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक -२९ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकरिता पंपचालक, विज तंत्री पदी तात्पुरत्या स्वरूपात चार महिन्याकरिता रूपये ६,०००/- फक्तचे मानधनावर नेमणूक करण्यांस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- अहमदनगर महानगरपालिका आस्था.जा.क्र. २८ दि.३०/६/२०११

विषय-पाणी पुरवठा विभागाकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पदांवर उमेदवारांची अटी व शर्ती नुसार केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत.

सादर,

दिनांक १७/३/२०११ रोजी मा.आयुक्त यांचे दालनामध्ये पाणी पुरवठा व्यवस्थापन व नियोजनाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यांत आलेली होती. सदर बैठकीमध्ये उन्हाळयाचे दिवस असल्याने शहरामधील भिषण पाणी टंचाई निर्माण होत असल्याने नागरिकांचे मोर्चे, रस्ता रोको आंदोलन तसेच विविध वर्तमान पत्रामध्ये बातम्या प्रसिध्द होत असल्याने पाणी पुरवठा विभागामधील तांत्रिक कर्मचारी तात्काळ मानधनावर नियुक्ती करणे बाबत मा. मॅकेनिकल इंजिनिअर, पाणी पुरवठा विभाग यांनी सुचीत केलेले होते.

त्यानुसार दिनांक २०/३/२०११ रोजी दैनिक पुढारी या वर्तमान पत्रामध्ये कंत्राटी करारानुसार पाणी पुरवठा विभागाकरीता तात्पुरत्या स्वरूपात पदांवर अटी व शर्ती नुसार चार महिन्या करीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखतीसाठी जाहिरात प्रसिध्दीस देण्यांत आलेली होती. त्या अनुषंगाने मा. निवड समितीने उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ५/४/२०११ रोजी घेवुन कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पदांवर चार महिन्या करीता अटी व शर्ती नुसार मानधनावर खालील प्रमाणे उमेदवारांच्या करारबध्द नियुक्ती पाणी पुरवठा विभागामध्ये करण्यांत आलेल्या आहेत.

| अ.नं. | उमेदवारांचे नांव | तात्पुरत्या स्वरूपात हुद्दा | दरमहा मानधन | आस्था./कंत्राटी नेमणुक जा.क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | ६०००/- | २१६ दि.२६/४/२०११ |
| २ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | ६०००/- | २१६ दि.२६/४/२०११ |
| ३ | गोरे कवि दशरथ | पंपचालक | ६०००/- | २१६ दि.२६/४/२०११ |
| ४ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ६०००/- | २१६ दि.२६/४/२०११ |
| ५ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | ६०००/- | २१६ दि.२६/४/२०११ |
| ६ | कदम संतोष विलासराव | विज तंत्री | ६०००/- | २१७ दि.२६/४/२०११ |
| ७ | पालवे संदिप गोरक्षनाथ | विज तंत्री | ६०००/- | २१७ दि.२६/४/२०११ |
| ८ | चव्हाण अनिकेत बाळासाहेब | विज तंत्री | ६०००/- | २१७ दि.२६/४/२०११ |

तरी वरीलप्रमाणे उमेदवारांची पाणी पुरवठा विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात पदांवर कंत्राटी करारानुसार चार महिन्या करीता अटी व शर्ती नुसार मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभागाकरिता पंपचालक, विज तंत्री पदी तात्पुरत्या स्वरूपात चार महिन्याकरीता मानधनावर नेमणूका करण्यांस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि. आ. :- चार महिन्याकरिताच यांची आवश्यकता होती का ?

मॅकेनिकल इंजि. श्री.निकम पी.जे. :- कायम स्वरूपी आवश्यकता आहे परंतु पुढील सहा महिन्याकरिता पुन्हा नेमणेस मंजूरी मिळावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. पुढील सहामहिन्याकरिता पाणी पुरवठा विभागासाठी पंपचालक, विज तंत्री यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. लोंढे सु. सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. तसेच पुढील सहामहिन्यासाठी त्यांना नेमणूक देणेस मंजूरी द्यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. पुढील सहामहिन्याकरीता सर्वानुमते मुदतवाढ देण्यांत यावी.

**ठरावः-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाकरिता पंपचालक, विज तंत्री पदी तात्पुरत्या स्वरूपात चार महिन्याकरिता रूपये ६,०००/-(रूपये सहा हजार फक्त)चे मानधनावर नेमणूक करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर

तसेच त्यांना पुढील सहामहिन्याकरिता ही नेमणूक देणेस मंजूरी देण्यांत येत आहे

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- ३० मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - ३० मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ म्हणून दरमहा रूपये १५००/- फक्तचे मानधनावर दिनांक २८/६/२०११ ते २७/१२/२०११ अखेर सहामहिने कालावधीसाठी कंत्राटी करारानुसार नेमणूक देणेस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर** :- अहमदनगर महानगरपालिका आस्था.जा.क्र. २९ दि.६/७/२०११

विषय- कै .बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत.

सादर,

विनंती की, मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी बा.दे.दवा. यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह १४२ दिनांक ४/६/२०११ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता नेहमी भासते. आस्थापना सुचीवर बालरोग तज्ञांचे पद मंजुर नसल्यामुळे बालरोग तज्ञ डॉक्टरांची (ऑनरी बालरोग तज्ञ म्हणून) मानधनावर नेमणुक करावी लागते कै.बा.दे. दवा. व सुतिका गृह येथे मानद बालरोग तज्ञ म्हणुन- १) डॉ.श्री. सुभाष फिरोदिया M.D. , २) डॉ.श्री. अनिरूध्द गिते M.D., ३) डॉ.श्री. सुचित तांबोळी M.B.B.S.D.C.H.P. G.D.M.L.S. यांची जा.क्र. आस्था./ कंत्राटी करार नेमणूक ३९९२ दि.०८/०३/२०११ अन्वये दरमहा रू.१५००/- च्या मानधनावर दिनांक २७/१२/२०१० ते दि.२६/०६/२०११ अखेर सहा महिन्यांकरीता नेमणूक केलेली होती. सदरच्या नेमणुकीची मुदत दिनांक २६/०६/२०११ रोजी संपत आहे. वरील तीन बालरोग तज्ञ डॉक्टरांनी त्यांची मुदत संपत आल्यामुळे कै.बा. दे. दवाखान्यामध्ये मानधनावर रूग्णांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी पुढील काळासाठी नेमणुक चालू ठेवण्याबाबत विनंती अर्ज दिलेले आहेत. वरील बालरोग तज्ञ दवाखान्यातील नवजात अर्भकांची तपासणी करून औषधोपचार करतात. त्यामुळे दवाखान्यात येणा-या गरीब व गरूजू रूग्णांना त्याचा जास्तीत जास्त फायदा होतो. आपल्या दवाखान्यामध्ये प्रामुख्याने बाळंत कसेस असल्याने बालरोग तज्ञ असणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणुन हॉस्पीटलची व पर्यायाने पेंशटची गैरसोय होउ नये याकरीता डॉ. सुभाष फिरोदिया, डॉ. अनिरूध्द गिते व डॉ. सुचित तांबोळी या बालरोग तज्ञांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५४ अन्वये एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि.२८/६/२०११ ते २७/१२/२०११ अखेर सहा महिन्यांक करीता दरमहा रू.१५००/- च्या मानधनावर नेमणूक होणे बाबत. नमुद करून सुचित केलेले आहे.

तरी मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता १]डॉ.श्री. सुभाष फिरोदिया,एम.डी. २] डॉ.श्री. अनिरूध्द गिते, एम.डी. ३] डॉ. श्री. सुचित तांबोळी, एम. बी. एस .डी. सी. एच.पी.जी.डी.एम.एल.एस. यांची जा.क्र. आस्था./ कंत्राटी करार नेमणूक ९२१ दिनांक ०५/७/२०११ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ या पदा वर नेमणुक आदेशातील

अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी कारारनुसार दरमहा रूपये १५००/- (अक्षरी रूपये एक हजार पाचशे मात्र) या मानधनावर दिनांक २८/०६/२०११ ते २७/१२/२०११ अखेर सहा महिन्याच्या कालावधी करीता केलेल्या करार बध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञांची नेमणूक देणेस कार्योत्तर मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह येथे डॉ.श्री. सुभाष फिरोदिया, डॉ.श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ म्हणून दरमहा रूपये १५००/-(रूपये एक हजार पाचशे फक्त) चे मानधनावर दिनांक २८/६/२०११ ते २७/१२/२०११अखेर सहामहिने कालावधीसाठी कंत्राटी करारानुसार नेमणूका देणेस कार्योत्तर मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- ३१ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - ३१ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार रेव्ह फादर थॉमस डि कास्टा, संत आन्ना चर्च स.नं.१०५, वॉर्ड क्र. १० बील नंबर २१२, कलेक्टर कचेरी समोर ही मिकळत धार्मिक क्षेत्र असल्यामुळे सन २००५-२००६ पासून कर आकारणी कमी करणे बाबतचा अर्ज व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर** :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ दि.३१/७/२०१०

विषय- संत आन्ना चर्च यांच्या घरपट्टी व पाणीपट्टी कराबाबत.

संदर्भ : संत आन्ना चर्चचे धर्मगुरू यांचा दिनांक ८ जुलै २०१० चा अर्ज

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, संत आन्ना चर्चचे धर्मगुरू यांनी दि.८ जुलै २०१० रोजी अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये मुद्दे क्र.१ ते ६ मांडलेले आहेत. त्या अनुषंगाने मुद्दा क्र.१ मध्ये संत आन्ना चर्च हे ख्रिस्ती समाजाचे देवमंदिर आहे. या ठिकाणी प्रार्थना, धार्मिक विधी व धार्मिक उपक्रम राबविले जातात. मुद्दा क्र.३ मध्ये संत आन्ना चर्च वास्तुमध्ये तेवीस वर्षापुर्वी सेक्रेड हार्ट कॉन्हेंट शाळा होती. परंतु हया शाळेचे स्थलांतर भुईकोट किल्ल्या नजीक झालेले आहे. सदरची शाळा स्थलांतर झाल्याची माहिती आपल्या कार्यालयास देण्यांत आलेली आहे. तरी आपल्या कार्यालयाकडुन शाळेच्या आधारावरच घरपट्टी व पाणीपट्टीची आकारणी केली जाते. सदरची वास्तु पुर्णतः धार्मिक कार्यासाठीच वापरली जात आहे. मुद्दा क्र.४ मध्ये पाणी पट्टी शाळेच्या दराप्रमाणे दिली जाते वास्तविक पाण्याची सुविधा भाविकांच्या गरजेकरीता वापरली जाते व मुद्दा क्र.६ मध्ये कृपया करपट्टी धार्मिक संस्थेच्या आधारावरच आकारावी अशा प्रमुख मागण्या केलेल्या आहे.

वास्तविक परिस्थिती अशी की, संत आन्ना चर्चची मिळकत वॉर्ड क्र.१० बील क्रमांक २११ वर मदर सुप. सेक्रेड हार्ट (कॉन्हेंट हायस्कुल), बिल क्र.२१२ रेव्ह. फादर चॅपलिन डी.डी.व्ही. व बिल क्र.२१३ रेव्ह. रेड क्वाटर्स अशी नोंदवलेली आहे. सदर मिळकतीवर सन १९९५ ते २०११ अखेर घरपट्टी व पाणीपट्टी मिळुन अनुक्रमे ४,९५,३६६/- , ४,६४,५६६/- व ८५,०३१/- अशी थकबाकी आहे. त्यांनी सन २००० मध्ये मा. कोर्टामध्ये दावा क्र.६०२, ६०३ व ६०४ असे दाखल केलेले आहे.

संत आन्ना चर्चचे धर्मगुरू यांनी दि. ८ जुलै २०१० च्या अर्जामधील मुद्दा क्र.३ मध्ये पाणीपट्टीची शाळेप्रमाणे आकारणी केलेली आहे. मात्र सन २००३-०४ या आर्थिक वर्षात रिव्हीजनच्या वेळेस बिल क्र.२११ वर शाळा बंद असल्याचे नमुद केले आहे. त्यांच्यावर शाळेनुसार आकारणी केलेली दिसुन येत नाही मात्र घरपट्टी बिलामध्ये वाणिज्य प्रमाणे आकारणी केलेली आहे.

संत आन्ना चर्चचे धर्मगुरू यांनी दि.८ जुलै २०१० च्या अर्जामधील मुद्दा क्र.४ मध्ये पाणी पट्टीची शाळेप्रमाणे आकारणी केलेली आहे. सन२००३-०४ या आर्थिक वर्षात मा. प्रशासकीय ठराव क्र.२ दिनांक १७/७/२००३ मधील मुद्दा क्र.१ ब मध्ये व्यापारी संस्था / शाळा / शासकीय निमशासकीय कार्यालय / महाविद्यालय / खाजगी दवाखाने / हॉस्पीटल / लॉजिंग / धर्मादाय संस्था किंवा ट्रस्ट (ना नफा ना तोटा तत्वावरील ) यांना व्यापारी वापर म्हणुन पाणीपट्टीची आकारणी करणे बाबत मान्यता दिलेली आहे. त्यानुसार बि.क्र. २११ वर सन २००३-०४ पासुन सुधारित दरानुसार रू.१०८००/- पाणीपट्टीची आकारणी केलेली आहे. त्यामुळे त्यांच्यावर केलेली पाणीपट्टीची आकारणी योग्य आहे.

संत आन्ना चर्चचे धर्मगुरू यांनी दि.८ जुलै २०१० च्या अर्जामधील मुद्दा क्र.६ करपट्टी धार्मिक संस्थेच्या आधारावरच करणे बाबत विनंती केलेली आहे. सन २००३-०४ या आर्थिक वर्षात रिव्हीजनच्या वेळेस बिल क्र.२१२ वर चर्चची आकारणी केलेली दिसुन येत आहे.

बिल क्र.२१२ वर केलेल्या आकारणीची दिनांक २-८-२०१० रोजी समक्ष पहाणी केली असता ४६१:०६ चौ.मी. इतके तळ घर क्षेत्रफळामध्ये पाणी साठल्याचे, ३५६:२५ चौ.मी. इतके तळ मजला चर्चसाठी वापरत असल्याचे व ९७:९४ चौ.मी. इतके पहिला मजला प्रेक्षक गॅलरीसाठी वापरत असल्याचे व दुसरा मजला, तिसरा मजला व चौथा मजला ३२:५५ चौ.मी. इतके क्षेत्रफळ घंटा घरासाठी असे सर्व मिळुन ९४७:८० चौ.मी. इतके धार्मिक क्षेत्रफळ आढळुन आलेले आहे.

त्यानुसार ९४७:८० इतक्या चौ.मी. धार्मिक क्षेत्रावर केलेली कर आकारणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ मधील ३ मध्ये "जेथे कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा कोणताही भाग केवळ सार्वजनिक पुजेअर्चेसाठी किंवा सार्वजनिक धर्मादायाच्या प्रयोजनासाठी भोगवटयात आहे व वापरण्यात येतो या कारणावरून त्यास सामान्य करापासून सुट देण्यात आली असेल तेव्हा, असा भाग नगरपालिका कराधानाच्या प्रयोजनासाठी वेगळी मालमत्ता असल्याचे मानले जाईल" अशी तरतुद आहे. /**अ**

तरी ९४७:८० इतके चौ.मी. धार्मिक क्षेत्रावर केलेली आकारणी सन २००३-०४ पासून कमी करणे उचित वाटते. त्याप्रमाणे परिशिष्ट "अ" , सिंगल डबल फॉर्म , रिव्हीजन रजिस्टर, डिमांड रजिस्टर व संगणकावर नोंदी घेणेस्तव आदेशार्थ सादर./ **ब**

येणेप्रमाणे वसुली लिपीक प्रभाग समिती क्र.३ यांचा अहवाल असे.

--**--

क. नि. :- 'अ' व 'ब' नुसार धार्मिक वापर असल्यामुळे सन २००३-०४ पासून कर आकारणी कमी करणे उचित वाटते. तथापि आदेशार्थ सादर.

रिव्हीजन विभाग :- सादर, मा. कर निरीक्षक आणि लिपीकाचे अहवालानुसार कार्यवाही होणे अपेक्षीत

सहा. मुल्य. निर्धारक कर संकलन अधिकारी :- सादर, वसुली लिपिक व कर निरिक्षक यांचे अहवालानुार अ व ब नुसार धार्मिक वापर असल्यामुळे आकारणी कमी करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

मुख्य लेखा परिक्षक :- प्रस्तावीत 'अ' व 'ब' मान्य

मा.उपायुक्त साहेब (कर):- प्रस्तावीत 'अ' व 'ब' नुसार मालमत्ताची करांची रक्कम किती येते या तपशीलासह सादर करावे.

प्रभाग समिती क्र. ३ वसुली लिपिक :- फेरसादर, विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.१० बिल क्र. २१२ रेव्ह फादर चॅपलीन डी.डी. व्ही. या मिळकतीवर सन १९९५ ते २०११ अखेर घरपट्टी रू.४,६४,५६६/- इतकी थकबाकी आहे. सदर धार्मिक क्षेत्राची दरवर्षास कर आकारणी रू.३०,८६३/- इतकी होते.

सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासुन धार्मिक क्षेत्राची कर आकारणी कमी केली तर ती कर आकारणी रू.१,८८,८६४/- इतकी घन कचरा व रस्ताकर धरून होते.

तरी सन २००५-०६ पासून धार्मिक क्षेत्राची कर आकारणी कमी करणे उचित वाटते. तथापी आदेशार्थ सादर.

प्रभाग अधिकारी प्र.स.क.३ :- फेर सादर

मा.उपायुक्त (कर) :- मुलेअ यांचे अभिप्रायासह सादर करावे.

मुख्य लेखा परिक्षक/ मु.ले.अ. :- प्र. अधिकारी यांचे वरील अभिप्रायानुसार कार्यवाही करावी.

मा.उपायुक्त साहेब :- पूर्वीचे करयोग्य मुल्य व प्रस्तावीत करयोग्य मुल्यांच्या तक्त्यासह सादर करा.

प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.३ :- फेरसादर, सन २००५-०६ पासून धार्मिक क्षेत्राचे करयोग्य मुल्य ९२,१२६/- इतके होत आहे व रहिवास क्षेत्राचे करयोग्य मुल्य ६,३१७/- इतके होत आहे.

तरी धार्मिक क्षेत्राचे करयोग्य मुल्य ९२,१२६/- सन ०५-०६ पासून कमी करणे योग्य वाटते. तथापी आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त (कर) :- १] प्रस्तावाप्रमाणे सन २००५-०६ पासून दुरूस्ती करणेस मान्यतेस सादर.

२] कलम १५२ प्रमाणे रक्कम निर्लेखित करणेबाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे निर्णयास्तव ठेवणे बाबत मान्यतेस सादर.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१३/५/२०११

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- संत आन्ना चर्च या मिळकतीची कर आकारणी कमी करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- आपण इतर धार्मिक स्थानांस कर आकारणी माफ करतो का ?

प्रभाग अधिकारी श्री. वर्मा :- मा. महासभेचे ठरावानुसार धार्मिक स्थानाचे कर आकारणी मध्ये सुट देण्यांत येते.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ही गोष्ट सर्वाच्याच लक्षात येत नाही.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- सर्व धार्मिक स्थानाची कर आकारणी माफ करावी.

प्रभाग अधिकारी श्री. वर्मा :- कर आकारणी कमी करणेस हरकत नाही.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- या धार्मिक स्थळाचे संकलीत करामध्ये किती कर माफ होतो. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ अन्वये संकलीत कर पुर्ण माफ होतो का ?

प्रभागअधिकारी श्री. वर्मा :- सदर जागेतील धार्मिक क्षेत्राचे सन २००५-२००६ पासून रूपये ९२,१२६/- इतके करयोग्य मुल्य कमी होते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३२ अन्वये ३ नुसार "जेथे कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा कोणताही भाग केवळ सार्वजनिक पुजेअर्चेसाठी किंवा सार्वजनिक धर्मादायाच्या प्रयोजनासाठी भोगवटयात आहे व वापरण्यात येतो या कारणावरून त्यास सामान्य करापासून सुट देण्यात आली असेल तेव्हा, असा भाग नगरपालिका कराधानाच्या प्रयोजनासाठी वेगळी मालमत्ता असल्याचे मानले जाईल" अशी तरतुद आहे

मा.श्री. डागवाले कि.आ. :- धार्मिक स्थळांमध्ये ही शॉपींग असते.

मा.श्री. भोसले ग. पुं. :- तसेच रहिवासा करिता ही वापर होतो.

मा.श्री. लोंढे सु.सो. :- त्यांना माफी देवु नये. धार्मिक स्थळाचे ऑफिस शॉपींग याचा कर घेणेत यावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.श्री. लोंढे सु.सो. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अर्जदार रेव्ह फादर थॉमस डि कास्टा, संत आन्ना चर्च स.नं.१०५, वॉर्ड क्र. १० बील नंबर २१२, कलेक्टर कचेरी समोर ही मिकळत धार्मिक क्षेत्र असल्यामुळे सन २००५-२००६ पासून करयोग्य मुल्य रक्कम रूपये ९२,१२६/-(रूपये ब्याण्णव हजार एकशे सव्वीस फक्त) कमी करणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.
सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- ३२ मंगळवार दिनांक १६/८/२०११

ठराव क्रमांक - ३२ मंगळवार दिनांक १६/८/२०११

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री. नानकराम मोटुमल नवलानी , वॉर्ड क्र.४२, बील क्र.४५५ व १२३० कवरंनगर तारकपुर यांना एकाच मिळकतीचे घरपट्टी कराचे दोन बीले येत असल्याबाबत त्यांचे घरपट्टीचे बील कमी करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आदेशार्थ सादर.

**प्रस्तावाचा मजकुर** :- अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.३ दि.१६/२/२०११

विषय- घरपट्टी बिलाची दोन ठिकाणी नोंद झाल्याबाबत.

संदर्भ : श्री. नानकराम मोटुमल नवलानी व सौ. द्रौपदी नानकराम नवलानी यांचा दिनांक ८/२/२०११ रोजीचा अर्ज

सादर,

विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, श्री. नानकराम मोटुमल नवलानी व सौ. द्रौपदी नानकराम नवलानी यांनी दि.८/२/२०११ रोजी अर्ज सादर केला आहे. त्या अर्जामध्ये त्यांनी "माझे कंवर नगर , तारकपुर या ठिकाणी वडिलोपार्जीत मिळकत आहे. त्यावर सन २००५-०६ या आर्थिक वर्षात आपण घरपट्टी आकारतांना बिल क्र.४५५ व १२३० वर आकारलेली आहे. मात्र माझे कंवर नगर येथे एकच मिळकत असुन आपण घरपट्टीची दोन बील केलेले आहे. तरी आपण एक बिल कमी करून दिल्यास घरपट्टी एक रकमी भरण्यांस तयार आहोत." अशी विनंती केलेली आहे.

या बाबत वस्तुस्थिती अशी की, वॉर्ड क्र.४२ बील क्र.४५५ व १२३० वर श्री. नानकराम मोटुमल नवलानी यांची मिळकत आहे. सन १९९५-९६ व २००३-०४ या आर्थिक वर्षात रिव्हीजनच्या सर्व्हेमध्ये बिल क्र.४५५ वर पुढील प्रमाणे कर आकारणी केलेली आहे.

| मजला | वापराचा प्रकार | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| तळ घर | वाणिज्य | ८०:३० |
| तळ म. | वाणिज्य | ११४:८४ , ८:०० |
| प.म. | गोडावुन | ११५:३८ |

तसेच सन २००५-०६ या आर्थिक वर्षात हॉस्पीटल, लॉजिंग, मंगल कार्यालय, पेट्रोल पंप यांचे सर्वेक्षण करण्यांत आले होते. श्री. नानकराम मोटुमल नवलानी यांच्या मिळकतीमध्ये "अर्जुन नेत्रालय" हे हॉस्पीटल भाडे तत्वावर होते. त्यामुळे सदर मिळकतीचे पुन्हा रिव्हीजन करून नवीन बिल करण्यांत आलेले आहे. असे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. त्याची कर आकारणी पुढील प्रमाणे.

| वापर | इमारत वय | मजला | वापराचा प्रकार | बांधकाम प्रकार | क्षेत्रफळ | दर | मासिक भाडे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| भाडेकरी | ३ | त.घ. | वाणिज्य | आर.सी.सी. | ३९:६८ | ३० | ११९० |
| भाडेकरी | ३ | त.म. | वाणिज्य | आर.सी.सी. | १२८:०० | ३० | ३८४० |
| मालक | ३ | त.म. | वाणिज्य | आर.सी.सी. | १३९:३३ | १८ | २५०८ |
| मालक | ३ | प.म. | रहिवास | आर.सी.सी. | २५२:१७ | ९ | २२७० |
| | | | | एकुण | ५५९:१८ | | |

१७७७८x१२ = २,१३,३३६/-

रिपेअर चार्ज (१०%) वजा = २१,३३४/-

करयोग्य मुल्य = १,९२,००२/-

"अर्जुन नेत्रालय" या हॉस्पीटलला दरमहा रू.१३,०००/- (अक्षरी रूपये तेरा हजार मात्र) इतके भाडे होते. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात हॉस्पीटल, नानक कलर शॉपी व निवास मिळुन त्यांच्या मिळकतीचे करयोग्य मुल्य रू. १,९१,०५२/- असे दाखविले आहे. मात्र त्यांचे मिळकतीचे करयोग्य मुल्य १,९२,००२/- इतके होत आहे.

श्री. नवलानी यांना एकाच मिळकतीची दोन बीले जात असल्याने सन १९९५-९६, सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील करयोग्य मुल्य व सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील करयोग्य मुल्य विचारात घेवुन एकत्रित बिल देणे उचित वाटते.

तसेच घरपट्टीचे दोन बील झाल्यामुळे एक बिल कमी करणेस्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक प्रभाग समिती क्र.३ यांचा अहवाल असे.

--**--

कर निरीक्षक :- वसुली लिपीक यांचे रिपोर्टास सहमत

प्रभाग अधिकारी :- प्रस्तुत प्रकरणी वसुली लिपीक व कर निरीक्षक यांचे मतास सहमत तपासणी करून मंजूरीस्तव सादर.

मा. स.क. मु.अ. :- श्री. झिने , सिव्हीजन प्रमुख तपासणी करून सादर करणे.

सहा. मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी :- सादर, सदर प्रकरणी सन २००५-०६ या आर्थिक वर्षामध्ये हॉस्पीटल, हॉटेल , लॉजिंग , मंगल कार्यालय इ. बाबत सर्व्हे करून झोन दरानुसार कर आकारणी करण्यात आली.

मिळकत धारक नानकराम मोटुमल नवलानी यांचे मिळकती मध्ये अर्जुन नेत्रालय हे हॉस्पीटल होते. सन २००५-०६ मध्ये सदर हॉस्पीटल "अ" श्रेणी देण्यांत येवुन भाडयाप्रमाणे १३०००/- रू [मासिक भाडे] हॉस्पीटल क्षेत्रावर कर आकारणी करण्यात आली. तसेच श्री. नवलानी यांचे वापरातील रहिवास व वाणिज्य क्षेत्रावर पण सन २००५-०६ या वर्षी त्याच बीलात एकत्रच कर आकारणी करण्यात आली.

सन २००३-०४ च्या सिव्हीजन मध्ये श्री. नवलानी यांचे बील नं. ४५५ वर आकारणी करण्यांत आली होती. वास्ताविक सन २००५-०६ मध्ये श्री. नवलानी यांचे बिल नं. ४५५ वरील आकारणी कमी (रद्द) कराण्यास पाहिजे होती. तसे न झाल्याने नवलानी यांना सन २००५-०६ पासुन बील नं.४५५ व बील नं.१२३० अशी दोन बीले देण्यांत येत.

सन २००५-०६मध्ये श्री.नानकराम नवलानी यांना [अर्जुन नेत्रालय]बील नं.१२३० या बिलामध्ये भाडयाप्रमाणे हॉस्पीटलचे करयोग्य मुल्य रू.१,४०,०००/-व श्री.नवलानी यांचे दुकान व घर या जागेचे करयोग्य मुल्य५०,६५२/-असे एकुण १,९१,०५२/- करयोग्य मुल्य नुसार बील दिल जाते. व बील नं.४५५ चे करयोग्य मुल्य ४१,२८८/- प्रमाणे दुसरे बील जात आहे.

तरी श्री नवलानी यांना बील नं. १२३० करयोग्य मुल्य १,९१,०५२/- प्रमाणे दिलेले बील बरोबर असल्याने त्याची संपूर्ण वसुली करण्यात यावी. व बील नं.४५५ वरील बील सन २००५-०६ पासून रद्द करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण-८ कराधान नियम २०(१) (क) अन्वये दुरूस्तीस हरकत नाही व सदर बीलाची येणे असलेली रक्कम अधिनियमतील कलम १५२ नुसार मा. स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करणे योग्य होईल. तथापी आदेशार्थ सादर. **/अ**

मुख्य लेखा परिक्षक / मु.ले.अ. :- "अ" प्रमाणे त्यांच्या थकीत कराची संपुर्ण वसुली करण्यांत यावी व सन २००५-०६ पासून कर निर्लेखित करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर चर्चेसाठी ठेवणेत यावा. **/ब**

मा.उपायुक्त साहेब :- "ब" प्रस्तावीत मान्यतेस सादर.

मा.आयुक्त साहेब :- सदर नस्ती एवढे उशीरा का सादर करण्यांत आली. दि.२४/६/२०११

--**--

प्रभाग अधिकारी :- फेरसादर, विनंती अहवाल सादर करण्यांत येतो की, मा.श्री.आर.ए. देशमुख, प्रभारी उपायुक्त साहेब हे दि.३१/५/२०११ रोजी सेवानिवृत्त झालेले आहे. त्यांच्या कार्यालयाकडून सदरची नस्ती उशिरा प्राप्त झाल्याने नस्ती सादर करणेस विलंब झालेला आहे. तथापी आदेशार्थ सादर.

सहा. मुल्य निर्धारक व कर सं.अ. :- मा.उपायुक्त (कर) यांचे नस्ती नोंद रजिस्टर पहता उपायुक्त यांचेकडून नस्ती मा.आयुक्त यांचेकडे पाठविण्या ऐवजी नजरचुकीने प्र.समि. अधि. पाठविण्यांत आली (दि.०७/०६/११) त्यानंतर प्र.समि.अधि. यांचेकडून सदर नस्ती दि.२४/६/११ रोजी पुन्हा मा.उपायुक्त यांचे कार्यालयात आली. त्यामुळे सदर नस्ती सादर करण्यांत उशीर झाल्याचे आढळून येते खुलासा सविनय सादर.

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समिती पुढे पाठवा. दि.४/७/२०११

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- तारकपुर येथील श्री. नवलानी यांचे एकच मिळकतीची दोन बीले येत असल्याने त्यांचे घरपट्टी बील कमी करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. डागवाले कि. आ. :- त्यांच्या दोन प्रॉपर्टी वर कर आकारणी केली त्याप्रमाणे त्याच्या दोन प्रॉपर्टी असतील.

प्रभाग अधिकारी श्री. वर्मा :- जुनी इमारत पाडून नविन बांधली आहे त्यांचे नविन इमारतीवर ही कर आकारणी केली असल्याने दोन बीलापैकी एक बील क्रमांक ४५५ सन २००५-०६ पासून रद्द करण्यांस मंजूरी मिळणे साठी प्रस्ताव सादर केला आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- त्यांची किती रक्कम माफ होते आहे.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- बील क्रमांक ४५५ वरील कर सन २००५-२००६ पासून निर्लेखित करणे आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. भोसले ग. पुं. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अर्जदार श्री. नानकराम मोटुमल नवलानी , वॉर्ड क्र.४२, बील क्र.४५५ व १२३० कवरंनगर तारकपुर यांना एकाच मिळकतीचे घरपट्टी कराचे दोन बीले येत असल्याने त्यांचे प्रॉपर्टीचे बील नंबर ४५५ सन २००५-२००६ पासून रद्द करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.श्री. लोंढे सुभाष सोपानराव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका